# मुख्यमंत्र्यांनी अधिकारी, लोकप्रतिनिधींचा घेतला वर्ग

## विकासकामे तातडीने मार्गी लावण्याचे दिले निर्देश : साखळी मतदारसंघातील घेतला विकासकामांचा आढावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २९ :** सरकारी अधिकाऱ्यांनी सामाजिक जाणीव वेळेचे भान ठेवून जनतेला सर्व प्रकारच्या सुविधा बहाल करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत योजना मार्गी लावाव्यात. लोकप्रतिनिधींनी आपापल्या प्रभागात विकासकामे करताना कामाचा दर्जा व वेळेत काम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने समन्वय साधत काम करा, असे निर्देश मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी येथे सरकारी अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या संयुक्त बैठकीत केले.

रवींद्र भवन साखळी येथे साखळी मतदारसंघातील विविध विकास योजनांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष सिद्धी प्रभू तसेच विविध पंचायतीचे सरपंच , उपजिल्हाधिकारी नगराध्यक्षा विविध खात्याचे अधिकारी उपस्थित होते.



**साखळी : साखळी मतदारसंघ विकास योजनाच्या आढावा बैठकीत बोलताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. बाजूला सरपंच, नगरसेवक व इतर.**

वीज व्यवस्था, पाणी व्यवस्थापन, शेतीसाठी पाणी व्यवस्थापन, पायाभूत सुविधांचे जाळे विणणे, कचरा व्यवस्थापन, कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावणे तसेच विविध खात्यातील कामांचा आढावा तपशीलवार यावेळी मुख्यमंत्र्यांनी घेतला.

कोणती कामे कुठे कशासाठी रखडली, उशीर का झाला वेळेत का पूर्ण झाली नाही, कधी पूर्ण करणार त्याची कारणे अशा सर्व बाबतीत मुख्यमंत्र्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना कान पिचक्या देत कामे पूर्ण करा, असे आदेश दिले. लोकप्रतिनिधींनी सरपंच, पंचायतसदस्य नगरसेवकांनी आपापली जबाबदारी ओळखून कामे वेळेत पूर्ण करावी, आपली जबाबदारी झटकू नये. कचरा व्यवस्थापन करणे महत्त्वाचे असून अनेक ठिकाणी आजही केवळ कचरा शेड उभारून पंचायती मोकळ्या झाल्या आहेत. मात्र, कचरा तसाच आहे.

त्याबाबत दक्षता घेणे गरजेचे असून सर्वत्र स्वच्छता राखणे, आपापला प्रभाग विकासाने सज्ज करणे, पायाभूत मूलभूत सुविधा प्रत्येक गावात पुरवणे तसेच जनतेचे प्रश्न सोडवताना केंद्र व राज्याच्या योजना घरोघरी पोहोचवणे महत्त्वाचेआहे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. जी कामे रखडली आहेत ती पूर्ण करण्यासाठी ना हरकत दाखले जमिनीची उपलब्धता याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करावा, असे आवाहन वजा आदेश मुख्यमंत्री यांनी या बैठकीत दिले.

साखळी मतदारसंघात विकासाबाबत बहुतेक कामे पूर्ण झालेली असून आता स्वयंपूर्ण साखळी मतदारसंघ हे स्वप्न पूर्णत्वास यावे यासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. त्याचा पाठपुरावा करा, समूह शेती तसेच वडिलोपार्जित पडीक शेती लागवडीखाली आणण्यासाठी सरकारी योजनांचा सर्वत्र फायदा घेऊन कृषी कार्ड तसेच उपलब्ध कर्ज वितरण व्यवस्था याचा लाभ घेऊन हरित, धवल क्रांतीचा ध्यास घेत साखळी मतदारसंघ पायाभूत सुविधा मूलभूत सुविधा तसेच पालेभाजी व इतर उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्याचा संकल्प यशस्वी करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

विविध प्रश्नांच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी अधिकारी व लोकप्रतिनिधींना योग्य पद्धतीने मार्गदर्शन केले. आपला गाव सुंदर स्वच्छ नितळ ठेवताना ओला– सुका कचरा व इतर कचरा योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येक घरातून सहकार्याची अपेक्षा आहे, त्या दृष्टीने लोकप्रतिनी सरकारी अधिकाऱ्याने लक्ष द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

पंचायत सरपंच आणि आपापले प्रश्न मांडले. वेगवेगळ्या विकासकामांचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला व विकासाला चालना देण्याचे व सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# बेकायदेशीर बांधकामांविरोधात सर्वेक्षण मोहीम सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. २९ :** पंचायत संचालकांच्या (डीओपी) निर्देशांनुसार, कळंगुट पंचायतीने सोमवारपासून बेकायदेशीर बांधकामे ओळखण्यासाठी व्यापक सर्वेक्षण मोहीम सुरू केली आहे. उच्च न्यायालयाने ६ मार्च रोजी रस्त्यांच्या कडेला, महामार्गांवर आणि प्रमुख रस्त्यांवरील अनधिकृत बांधकामांविरोधात आदेश दिल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. या आदेशानुसार, विशेषत: व्यावसायिक हेतूंसाठी वापरल्या जाणाऱ्या बांधकामांवर कारवाई केली जाणार आहे.

१९ मार्च रोजी डीओपीच्या निर्देशानंतर, गेल्या आठवड्यात पंचायत सदस्यांच्या बैठकीत सर्व बांधकामांची स्थळ तपासणी करण्याचा ठराव पारित करण्यात आला. कळंगुटचे सरपंच जोसेफ सिक्वेरा यांनी सांगितले की, सर्वेक्षणासाठी १५ दिवसांची मुदत निश्चित करण्यात आली असली तरी ते पूर्ण होण्यास सुमारे एक महिना लागू शकतो. उपाध्यक्ष झिमर यांच्या नेतृत्वाखाली कँडोलिम सीमेपासून हडफडे पर्यंत, कळंगुट पोलिस स्टेशनपासून कळंगुट मार्केट आणि कळंगुट समुद्रकिनारा तसेच बागा रस्त्यावरील प्रमुख स्थळांची तपासणी केली जाणार आहे.

सरपंच सिक्वेरा यांनी स्पष्ट केले की, सर्वेक्षणादरम्यान ओळखल्या जाणाऱ्या अनेक बांधकामांना नगर नियोजन विभागाकडून परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले असू शकते. तथापि, आम्ही उच्च न्यायालयाच्या आदेशांचे तंतोतंत पालन करत आहोत आणि आमचा अनुपालन अहवाल न्यायालयाला सादर करणार आहोत.

काही महिन्यांपूर्वी कळंगुट उपाध्यक्षांच्या ग्रामसभेने व्यापार परवान्याशिवाय कार्यरत असलेल्या सर्व व्यावसायिक आस्थापनांची ओळख पटविण्यासाठी सर्वेक्षण करण्याचा ठराव संमत केला होता. तसेच, उपाध्यक्षांनी योग्य परवानगीशिवाय आणि सीआरझेड (कोस्टल रेज्युलेशन झोन) नो– डेव्हलपमेंट झोनमध्ये उभारण्यात आलेल्या अनेक अनधिकृत बांधकामांवर कारवाई करत ती जमीनदोस्त केली होती.



**आगरवाडा : सत्पुरुष देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित केलेल्या श्री सत्पुरुष महिला दिंडी सोबत मांद्रेचे माजी सरपंच तथा विद्यमान पंच प्रशांत ऊर्फ बाळा नाईक. सोबत देवस्थानचे पदाधिकारी**

# केरीत 'दुर्गा सदा मंगलम्' ग्रंथाचे विमोचन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २९ :** केरी – फोंडा येथील श्री विजयादुर्गा संस्थान समितीतर्फे प्रकाशित ' दुर्गा सदा मंगलम् ' या संदर्भ ग्रंथाचा विमोचन सोहळा संस्थानच्या सभामंडपात थाटात संपन्न झाला. या सोहळ्यास व्यासपीठावर प्रख्यात प्रवचनकार व व्याख्याते प्राचार्य रमेश सप्रे, माजी माहिती आयुक्त तथा पत्रकार संजय ढवळीकर, श्री विजयादुर्गा संस्थानचे अध्यक्ष डॉ. संतोष देसाई व सचिव राजेंद्र देसाई उपस्थित होते.



**केरी : 'दुर्गा सदा मंगलम ' या संदर्भ ग्रंथाचे विमोचन करताना प्राचार्य रमेश सप्रे, संजय ढवळीकर, डॉ. संतोष देसाई व राजेंद्र देसाई**

रमेश सप्रे म्हणाले की, आपल्या संस्कृतीत घर, शाळा व मंदिर ही तीन केंद्रे महत्त्वाची मानली असून विद्यालय हे फुफ्फुस आहे तर मंदिर हे हृदय आहे. आपली लोकसंस्कृती व लोककलेचा विकास मंदिराच्या माध्यमातून झालेला आहे. मी या संदर्भ ग्रंथाच्या प्रत्येक पानाला स्पर्श केलेला असून या ग्रंथात क्यू आर कोडची संकल्पना, काही नाविन्यपूर्ण शब्दांचा वापर करून अतिशय चांगले लेख लिहिलेले आहेत. सर्व बाजूंनी मनाला स्पर्श करणारा हा संदर्भ ग्रंथ असून जीवनाचा संदर्भ या ग्रंथात आहे. कारण तो खोलवर विचार करून कृतार्थ व कृतज्ञ भावनेने लिहिलेला ग्रंथ आहे. त्याचे निर्मिती मूल्यही अप्रतिम असेच आहे.

संजय ढवळीकर यांनी सांगितले की, या ग्रंथात देवस्थानचा इतिहास, परंपरा, वारसा, आवारात चाललेले प्रकल्प, उपक्रम, शिस्त अशा सर्व गोष्टींचा समावेश असल्याने ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांचे प्रतिबिंब या ग्रंथात उमटलेले आहे. या ग्रंथात अमूल्य असा मजकूर असून त्याची अर्थपूर्ण मांडणी केल्याने एक परिपूर्ण व अचूक असा ग्रंथ तयार झालेला आहे.पारंपरिकतेबरोबरच नव्या तंत्रज्ञानाची कास धरून हा ग्रंथ तयार केलेला असल्याने एक वैशिष्ट्यपूर्ण आगळावेगळा ग्रंथ या देवस्थान समितीने उपलब्ध करून दिल्याबद्दल देवस्थान समितीचे त्यांनी भरभरून कौतुक केले.

प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख डॉ. संतोष देसाई यांनी करून दिली. राजेंद्र देसाई यांनी या संदर्भ ग्रंथाचे स्वरूप सांगितले. मान्यवरांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. सुवर्ण शिखर कलश स्थापनेला योगदान लाभलेल्या कमलाकर साधले, कृष्णा सहकारी, लक्ष्मण पाटील, पुरुषोत्तम गावडे, संजय गावडे , संजय शर्मा यांचा सन्मान करण्यात आला.याशिवाय मंगेश ढवळीकर, अमोघ बर्वे, रोहित फळगावकर यांचाही सन्मान करण्यात आला. सूत्रनिवेदन सिध्दी उपाध्ये यांनी केले.

# संस्कृती संवर्धनाला माझा सदैव पाठिंबा

■ टीम दैनिक हेराल्ड

**▶ प्रशांत नाईक : सत्पुरुष देवस्थानच्या वर्धापनदिन उत्साहात**

**पेडणे, दि. २९ :** संस्कृती संवर्धन करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या आणि सामाजिक कार्याचा वसा घेणाऱ्या महिलांना माझा सदैव पाठिंबा असेल असे प्रतिपादन मांद्रेचे माजी सरपंच तथा विद्यमान पंच बाळा ऊर्फ प्रशांत नाईक यांनी केले.

आगरवाडा येथील श्री सत्पुरुष देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी श्री सातेरी देवस्थानचे अध्यक्ष सज्जन बगळी, सचिन बगळी, रामा बगळी, ज्ञानेश्वर बगळी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नाईक म्हणाले की, देवस्थाने ही परंपरा आणि संस्कृती संवर्धनाची केंद्रे आहेत. त्यात आपले हिंदू सण आणि उत्सव याचे प्रतिबिंब परावर्तित होते. संस्कारक्षम असलेल्या महिलांचा सहभाग असल्यास देवस्थानच्या प्रांगणात ही संस्कृती बहराला येईल असे सांगून त्यांनी आपण अशा कार्यासाठी देवस्थानांना सर्वोतोपरी सहकार्य करीन असे सांगितले.

सज्जन बगळी यांनी स्वागत केले. सचिन बगळी यांनी सूत्रसंचालन केले

बगळीवाडा आगरवाडा येथील श्री सत्पुरुष देवस्थानच्या या वर्धापनदिनी भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आले होते. श्री देवी सातेरीच्या कलशाचे सत्पुरुष देवस्थानात आगमन झाल्यानंतर त्या ठिकाणी पूजन करण्यात आले.त्या ठिकाणी सुवासिनींनी खणा नारळरानी ओटी भरून दर्शन घेतले.श्री सत्यनारायण पाडली दोन दिवस महाप्रसाद झाला. सुवासिनीतर्फे जोडियोत्सव पार पडला. वालावलकर दशावतारी नाट्यकंपनी तर्फे दशावतारी नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. शेवटच्या दिवशी श्री देवी सातेरीच्या कलशाचे श्री सत्पुरुष महिला दिंडीच्या सहभागाने वाजत गाजत श्री सातेरी मंदिराकडे प्रयाण झाले. यात महिलांनी उत्कृष्ट अशा दिंडीचे प्रदर्शन घडवले.

# वेळ्ळी येथील गोपाळकृष्ण देवस्थानचा आजपासून वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.२९ :** रांगाळी–वेळ्ळी येथील श्री ब्राह्मण देवता व श्री गोपाळकृष्ण देवस्थानाचा वर्धापनदिन दि. ३० मार्च ते ३ एप्रिलपर्यंत साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

दि. ३० मार्च रोजी पहिल्या दिवशी गुढीपाडवा उत्सव साजरा केला जाणार आहे. संध्याकाळी ६.३० वाजता 'श्री दत्तप्रसादीक दिंडी पथक' व ७ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, रात्री ९ वाजता भजन व त्यानंतर आरती, तीर्थप्रसाद होणार आहे. दुसऱ्या दिवशी दि. ३१ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता पुरोहिताकडून श्रीफळ वाचन (नव्या वर्षाचे पंचांग वाचन), त्यानंतर लिलावाचा कार्यक्रम होणार आहे व त्यानंतर ९ वाजता 'छावा' चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. दि. १ एप्रिलला रात्री ९ वाजता दोन अंकी विनोदी नाटक 'मोग म्हजो तुजो' सादर करण्यात येणार आहे. दि. २ एप्रिलला दोन अंकी कोंकणी नाटक मि. अँड मिसेस दाबोळकर सादर केले जाणार आहे. दि. ३ एप्रिलला श्री ब्राह्मण देवता व श्री गोपाळकृष्ण वर्धापनदिन सोहळा होणार आहे. सकाळी ९ वाजता गणपती पूजन, पुण्याहवण, मातृका पूजन देवानंदी, देवता स्थापना, देवता हवन, १२.३० वाजता पूर्णाहुती, देवता प्रार्थना, आरती व महाप्रसाद होईल. संध्याकाळी ६.३० वाजता शिव दामोदर भजनी मंडळ, फातोर्डातर्फे भजनाचा कार्यक्रम होणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा व श्रींच्या कृपेस पात्र व्हावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

# भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये महिला दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २९ :** पर्ये सत्तरी येथील श्री भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये दोन दिवशीय विविध कार्यक्रमांनी महिला दिन साजरा करण्यात आला. पहिल्या दिवशी श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाच्या हेल्थ केअर विषयाच्या शिक्षिका डॉ.संगीता अमोल पाटील यांनी 'महिलांचे आरोग्य' या विषयावर श्री भूमिका नर्सिंग कॉलेजचे कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाला श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाच्या रसायनशास्त्राच्या शिक्षिका सुनिता वेरेकर उपस्थित होत्या. त्यांनी 'महिला सक्षमीकरण' या विषयावर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. दोन्ही दिवशी कॉलेजच्या प्राचार्य डॉ. एस. वसंताकुमारी यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. त्यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगून महिला सक्षमीकरण आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांना समानतेला सतत पाठिंबा देण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांना या वर्षीच्या उत्सवाच्या थीमची आठवण करून देण्यात आली. ऍक्सिलरेट ॲक्शन म्हणजेच गतिमान क्रिया ही थीम घेऊन सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. संगीता पाटील यांनी सांगितले की, महिलांनी आरोग्याच्या बाबतीत स्वच्छतेला प्राधान्य दिले पाहिजे. महिला ही पुरुषांच्या बरोबरीची आहे.त्यांना समान हक्क आणि संधी आहेत.

सुनिता वेरेकर यांनी स्त्रियांच्या अधिकारांची माहिती दिली. शिक्षण, रोजगार आणि नेतृत्व या क्षेत्रात महिलांना सतत पाठिंबा मिळाला पाहिजे. यावेळी त्यांनी वैयक्तिक किस्से आणि अनुभव सांगितले. महिलांना मोठी स्वप्ने पाहण्यास प्रोत्साहित केले. सर्व महिला कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी लिंग समानतेसाठी समर्थन आणि एकता दाखवण्यासाठी स्वाक्षरी मोहिम घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एस. वसंताकुमारी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुमेधा राणे यांनी केले तर शैली गावस यांनी आभार मानले.

**BEFORE THE MAMLATDAR OF MORMUGAO TALUKA AT VASCO DA GAMA, GOA.**
**Mutation Cases No. 412031/VASCO/2025**

1. Sikandar Allasab Husur, R/o. H. No.100, Sasmollem, Baina, Near Our Lady of Candelaria School, Vasco da Gama, Goa. ...Applicant

V/s

1. Kashinath Mahadev Manerkar 2. Mahesh Narayan Chari 3. Sukumar Santra 4. Balkrishna Tukaram Shetye 5. Shaila B. Shetye 6. Deepashri Kashinath Manekar ...Opponents

**PUBLIC NOTICE**

To, all the Opponents/Legal heirs/any other interested parties.

The applicant Sikandar Allasab Husur, R/o. H. No. 100, Sasmollem, Baina, Near Our Lady of Candelaria School, Vasco da Gama, Goa. **requested to include his name as Holders of the property surveyed under P.T. Sheet No.170 of Chalta No. 10 of Vasco city of Mormugao Taluka for an admeasuring area 42sq. mtrs.** by virtue of Deed of Sale under Reg. No.652 at pages 43 to 60 of Book No.I, Volume NO.825 dated 22/04/2008 and Deed os Sale under Reg. No.229 at pages 553 to 592 of Book No.I, Volume No.379 dated 20/02/2003.

And whereas notices in Form No. G (See rule 14) sent to the co-owners/interested parties by registered A. D. post were returned unserved by the Postal Authorities with their remarks,"Insufficient Addresses/ Not Known/Left/Expired/ Unclaimed return to sender" or not return back.

And whereas the applicants vide his application dated 04/03/2025 along with Affidavit dated 04/03/2025, has requested the unserved co-owners/interested parties, if any be served by substitute service by way of publication of notice in the local daily newspaper.

And whereas, I am satisfied this is a fit case for ordering such service.

Now therefor notice is hereby given to the above mentioned parties under Order-V, Rule 20(1) A of Civil Procedure Code and they are hereby called upon to file their claims, objections, if any, before me in person or through their duly authorized agents **within 15 days** from the said publication of notice.

Take note that incase the claims and objections are not received by me as aforesaid. It will presumed that you have no objections to the mutation and the same shall be finalized in your absence.

Place :Vasco da Gama.
Date : 25/03/2025
Sd/-
**( Pravinjay Pandit)**
Mamlatdar of Mormugao Taluka
Vasco da Gama, Goa.
Seal

Sandeep Ads

**BEFORE THE MAMLATDAR OF MORMUGAO TALUKA AT VASCO DA GAMA, GOA.**
**Mutation Cases No. 412030/VASCO/2025**

1. Ranjit Kumar Pal, R/o. H. No.101, Sasmollem, Baina, Near Our Lady of Candelaria School, Vasco da Gama, Goa. ...Applicant

V/s

1.Sukumar Santra 2. Reena Santra 3.Kashinath Mahadev Manerkar 4.Deepashri Kashinath Manekar 5. Mahesh Narayan Chari 6. Balkrishna Tukaram Shetye ...Opponents

**PUBLIC NOTICE**

To, all the Opponents/Legal heirs/any other interested parties.

The applicant Ranjit Kumar Pal , R/o.H. No. 101, Sasmollem, Baina, Near Our Lady of Candelaria School, Vasco da Gama, Goa. **requested to include his name along with the name of Swapana Pal as Holders of the property surveyed under P.T. Sheet No.170 of Chalta No. 10 of Vasco city of Mormugao Taluka for an admeasuring area 113 sq. mtrs.** by virtue of Deed of Sale under Reg. No.183 at pages 364 to 381 of Book No.I, Volume NO.554 dated 09/02/2006 and Deed os Sale under Reg. No.229 at pages 553 to 592 of Book No.I, Volume No.379 dated 20/02/2003.

And whereas notices in Form No. G (See rule 14) sent to the co-owners/ interested parties by registered A. D. post were returned unserved by the Postal Authorities with their remarks,"Insufficient Addresses/ Not Known/Left/Expired/ Unclaimed return to sender" or not return back.

And whereas the applicants vide his application dated 17/03/2025 along with Affidavit dated 15/03/2025, has requested the unserved co-owners/interested parties, if any be served by substitute service by way of publication of notice in the local daily newspaper.

And whereas, I am satisfied this is a fit case for ordering such service.

Now therefor notice is hereby given to the above mentioned parties under Order-V, Rule 20(1) A of Civil Procedure Code and they are hereby called upon to file their claims, objections, if any, before me in person or through their duly authorized agents **within 15 days** from the said publication of notice.

Take note that incase the claims and objections are not received by me as aforesaid. It will presumed that you have no objections to the mutation and the same shall be finalized in your absence.

Place :Vasco da Gama.
Date : 25/03/2025
Sd/-
**( Pravinjay Pandit)**
Mamlatdar of Mormugao Taluka
Vasco da Gama, Goa.
Seal

Sandeep Ads

# इन्सुली घाटीत एसटी बसचा ब्रेक फेल झाल्याने अपघात

## चालक व वाहकासह ३२ प्रवासी जखमी : चालकाने प्रसंगावधान दाखवल्याने मोठा अनर्थ टळला

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. २९ :** कुडाळहून पणजीकडे जाणारी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची एसटी बस दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास इन्सुली घाटीत अपघातग्रस्त झाली. बसचे अचानक ब्रेक निकामी झाल्याने चालकाने प्रसंगावधान दाखवत बसला डोंगराच्या दिशेने वळवत दरडीवर चढवली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या अपघातात चालक व वाहकासह बसमधील सुमारे ३२ प्रवासी जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सावंतवाडी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.



जखमींमध्ये वृद्ध तसेच महिला, शालेय विद्यार्थी व लहान मुलांचाही समावेश होता. या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच, स्थानिक ग्रामस्थांनीही मदतकार्यात सक्रिय सहभाग घेतला. जखमी प्रवाशांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातात अनेक प्रवाशांच्या हात, डोके आणि पायाला दुखापत झाली. मात्र, सुदैवाने कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही. अपघातात बसचालक सचिन धुडे (वय ४४) यांच्या छातीला आणि वाहक दिनेश दत्ताराम शिरवलकर (वय ४७) यांच्या डोक्याला मार लागला. इतर जखमी प्रवाशांमध्ये सरिता मिस्त्री (४२, बांदा), सुचिता सूर्याची परब (४७, इन्सुली), सुगंधा मधुकर धुरी (६१, इन्सुली), प्रेक्षा उदय मुळीक (१३, होडावडे), विद्या राजेंद्र कर्पे (४१, साळगाव), हेमा सावंत (५२, पणजी), लक्ष्मी परब (४७, भालावल), स्मिता लक्ष्मण गावडे (२०, निगुडे), काजल सुरेश बहिरे (२०, बांदा), पलक सुरेश मयेकर (२०, निगुडे), सिद्धाप्पा बेळगावकर (७०, बेळगाव), रेगा बळवंत जाधव (७०, म्हापसा), मधुकर कृष्णा कडव (८०, आंबेगाव), अनिता बापू कुमार (२१, कोलगाव), प्रेमानंद यशवंत पालेकर (५२, दोडामार्ग), हेमंत शंकर पालयेकर (४७, मोरगाव), गोविंद केशव कदम (५६, कुब्रल), लक्ष्मण भिकाजी मोरजकर (७०, नेरुर), शंकर सोमा परब (७२, शिवापूर), लक्ष्मी बाबुराव राणे (६०, इन्सुली), गौरव गुरुनाथ सुतार (२२, झाराप), सखाराम लक्ष्मण घाटकर (७४, कुणकेरी), गोविंद वेलिप (५९, गोवा), हेलार गोविंद वेलिप (३०, गोवा), सखाराम जयवंत भिंगारे (५०, कुडाळ), संजय सावंत (४०, माजगांव), आनंद रघुनाथ गावडे (४९, गोवा), सुहानी चंद्रकांत पालव (४८, इन्सुली) आणि इतर काही प्रवाशांचा समावेश होता. अपघाताची माहिती मिळताच सावंतवाडीचे प्रांताधिकारी हेमंत निकम यांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालयात भेट देऊन जखमींची विचारपूस केली. कुडाळ पणजी ही एसटी बस इन्सुली घाटीतून खाली जात असताना गाडीचे ब्रेक निकामी झाल्याचे बस चालक सचिन धुडे यांच्या लक्षात आले. गाडीचा ताबा राखता येत नसल्याने तसेच एका बाजूला खोल दरी असल्याने चालकाने समय सूचकता व प्रसंगावधान राखून एसटी बस दरडीच्या बाजूने वळवली. त्यामुळे फार मोठा अनर्थ टळला.